महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

गुरुवार ❖ १९ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७४ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मुंबईत बोट बुडाली

## १३ जणांचा मृत्यू



दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ विशेष प्रतिनिधी

मुंबईच्या समुद्रात प्रवासी बोटीला स्पीड बोटनं दिलेल्या धडकेत आतापर्यंत १३ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. अपघात झाल्यानंतर यंत्रणेनं बचावकार्य हाती घेतलं होतं. आतापर्यंत १०१ जणांना वाचवण्यात यश आल्याची माहिती देण्यात आली. १३ मृतांमध्ये नौदलाच्या तिघांचाही समावेश असल्याची माहिती आहे. मृतांच्या नातेवाइकांना पाच लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मुंबई बोट दुर्घटनेबाबत मोठी अपडेट हाती आली आहे. मुंबईच्या गेटवेहून एलिफंटाला जाणाऱ्या प्रवाशांवर काळाने घाला घातला आहे. एलिफंटाला जाणारी नीलकमल बोट स्पीड बोटीच्या धडकेने बुडाली. या बोटमधील १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या बोटमधील १३ जणांचा बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये १० नागरिकांसहित ३ नेव्ही कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. या दुर्घटनेत दोघे जण गंभीर जखमी असल्याची माहिती मिळाली आहे. या दुर्घटनेतील मृतांना ५ लाखांची मदत जाहीर करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी सांगितली.



### नौदलाच्या बोटीची टक्कर

मुंबईत गेट ऑफ इंडिया पाहण्यासाठी रोज हजारो पर्यटक येत असतात. त्यातील काही पर्यटक गेट ऑफ इंडिया पहिल्यानंतर एलिफंटा येथील गुफा पाहण्यासाठी जात असतात. एलिफंटाला जाण्यासाठी पर्यटकांना बोटीने प्रवास करावा लागतो. बुधवारी दुपारी पर्यटकांनी भरलेल्या दोन बोटी एलिफंटाच्या दिशेने निघाल्या होत्या. या दोन बोटी पैकी एका बोटीला नौदलाच्या बोटीने टक्कर दिली. त्यानंतर बोट उलटली.

> नेव्हीची स्पीड बोट आली. तिने आमच्या बोटीला राऊंड मारला. त्यानंतर ती गेली. त्यानंतर पुन्हा ती बोट आली. त्या बोटीने नंतर आमच्या नीलकमल बोटीला धडक दिली.
>
> ❍ राजेंद्र परते
> नीलकमल बोटीचा मालक

# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

# तुकडेबंदी कायद्यात सुधारणा !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी

### राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडलेल्या विधेयकाला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजुरी



तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला अधिनियमात रुपांतरीत करण्यात आले. नागपुर हिवाळी आधिवेशनात विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संदर्भात मांडलेल्या विधेयकाला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरीकांनी खरेदी केलेल्या १ गुंठा, २ गुंठे, ३ गुंठे अशा क्षेत्रांचे तुकडे नियमानुकूल होण्यास मोठी मदत होईल असा विश्वास ना.विखे पाटील यांनी व्यक्त केला.तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला १० ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेऊन मा. राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने दिनांक १५/१०/२०२४ अध्यादेश प्रसिध्द करण्यात आलेला होता. या अध्यादेशाचे आज विधिमंडळाच्या मान्यतेने अधिनियमात रुपांतर झालेले आहे.

सन १९४७ साली अमलात आलेल्या तुकडेबंदी कायद्यातील तरतुदी नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रमाणभूत क्षेत्र ठरविण्यात आले होते. मात्र याप्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण करण्यास कायद्याने निर्बंध आहे. यामुळे सर्वसामान्य नागरीकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या.

०१७ साली करण्यात आलेल्या सुधारणे नुसार सन १९६५ ते २०१७ या कालावधीत झालेले तुकड्यांचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजार मुल्याच्या २५ टक्के रक्कम शासन जमा करणे आवश्यक होते. मात्र ही रक्कम सर्वसामान्य नागरीकांच्या आवाक्या बाहेर होती.

या अडचणींमुळे नागरीकांचे आर्थिक व्यवहारही थांबले होते. ही अडचण दुर करण्यासाठी महायुती सरकारने प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राची खरेदी विक्री करुन झालेले व्यवहार नियमित करण्यासाठी २०१७ सालापर्यंत असलेली मुदत २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत निर्णय करुन, २५ टक्क्याऐवजी ५ टक्के शुल्क भरुन या जमीनी नियमानुकूल करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलेली होती.

मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार मा.राज्यपालांच्या संमतीने १५ आक्टोंबर २०२४ रोजी अध्यादेशही काढण्यात आला होता. या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी मंत्री विखे पाटील यांनी विधान परिषद आणि विधानसभेमध्ये याबाबतचे विधेयक सादर केले.

या विधेयकाला दोन्हीही सभागृहात मान्यता मिळाल्याने तुकडा बंदी कायद्यातील सुधारणेचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचा मोठा दिलासा राज्यातील नागरीकांना मिळणार असून, याबाबत महसूल विभागाने माजी सनदी आधिकारी उमाकांत दांगट यांच्या नेमलेल्या समितीच्या शिफारसीही यासाठी विचारात घेण्यात आल्या आहेत.

# दोन हजार आदिवासी विद्यार्थी गणवेशाविना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर, ता. १८ (बातमीदार):

### पालघर जिल्ह्यातील निवासी एकलव्य मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांना सलग दुसऱ्या शैक्षणिक वर्षात गणवेशासाठी अनुदान नाही

पालघर जिल्ह्यातील निवासी एकलव्य मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांना सलग दुसऱ्या शैक्षणिक वर्षात गणवेशासाठी अनुदान दिले नसल्याने पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. जिल्ह्यातील कांबळगाव, सवणे, हिरवे, पळसुंडे आणि चळणी या ठिकाणी एकलव्य मॉडेल स्कूल आहे. शाळेतील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांना गणवेश दिला नसल्याने आदिवासी विकास विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे. दरम्यान, दोन गणवेश आणि अत्यावश्यक वस्तू खरेदीसाठी या शाळेतील विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात आठ हजार रुपये जमा केले जातात. यावर्षी ५० टक्के रक्कम जमा केली असून, उर्वरित लवकरच खात्यात वर्ग केली जाणार असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाकडून देण्यात आली.

आदिवासी आश्रमशाळांमधील पाचवीतील विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेनंतर एकलव्य मॉडेल स्कूलमध्ये सहावीपासून प्रवेश दिला जातो. एका वर्गात ३० विद्यार्थी आणि ३० विद्यार्थिनी मिळून ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. सहावी ते बारावीपर्यंतचे वर्ग मिळून ४२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पालघर जिल्ह्यात एकलव्य मॉडेल स्कूलच्या कांबळगाव, सवणे, हिरवे, पळसुंडे आणि चळणी या पाच शाळांमध्ये असे एकूण २१०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या पाचवीच्या विद्यार्थ्यांना एकलव्य मॉडेल स्कूलमध्ये प्रवेश देण्यासाठी परीक्षा घेतली जाते. दरवर्षी साधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यात प्रवेश परीक्षा होते. प्रवेश परीक्षेत गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या सीबीएससी बोर्ड असलेल्या या शाळेत प्रवेश दिला जातो.

यंदाचे अर्धे शैक्षणिक वर्ष संपले तरी या शाळांतील २१०० विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध झाला नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. या विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाकडून गणवेश उपलब्ध केला जातो. मात्र, सलग दुसऱ्या शैक्षणिक वर्षात गणवेश मिळाला नसल्याची माहिती पालकांनी दिली

> सरकारी निर्णयानुसार एकलव्य मॉडेल स्कूलमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये डीबीटी अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांना ५० टक्के अनुदान वितरित केले. उर्वरित डीबीटी अनुदानाचा दुसरा हप्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
>
> - नयना घुडे, आयुक्त
> आदिवासी विकास विभाग, नाशिक

- एका शैक्षणिक वर्षात प्रत्येक विद्यार्थ्याला दोन गणवेश दिले जातात.
- पालघर जिल्ह्यात कांबळगाव, सवने, चळणी, हिरवे, तर ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यात शेंडेगाव येथे निवासी एकलव्य मॉडेल स्कूल आहेत.
- राज्यात सुरू असलेल्या एकूण ३७ निवासी एकलव्य मॉडेल स्कूलमध्ये सुमारे नऊ ते दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



# भिवंडी निजामपूर महापालिकेत आजपासून 'सुशासन सप्ताह'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी ☐ वार्ताहर

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार 'प्रशासन गाँव की ओर' या अभियांनतर्गत संपूर्ण देशामध्ये दि. १९.१२.२०२४ ते २४.१२.२०२४ या कालावधीत सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सुशासन सप्ताह कालावधीत करावयाचे कामाबाबत मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना काटेकोर अंमलबजावणीच्या सूचना दिल्या असून नागरीकांच्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करणेकामी शिबीर आयोजित करणे तसेच CPGRAMS पोर्टल (पुर्वीचे PG Portal) वरील तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याबाबत सूचना केल्या आहेत. या सप्ताहातून आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचेही निराकरण होणार आहे. ऑनलाईन पद्धतीने देण्यांत येणाऱ्या सेवांमध्ये वाढ करणे.तसेच ऑनलाईन सेवांबाबतचे अर्ज तात्काळ निकाली काढणे. विविध विभागांमार्फत सदर कार्यक्रमाच्या जनजागृती/प्रसाराबाबतची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविणे हा या उपक्रमाचा उद्देश असेल.

वरील सर्व सुचनांवर तात्काळ कार्यवाही करुन सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्याच्या सूचना भिवंडी निजामपूर शहर महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांनी दिल्या आहेत. सदर बैठकीसाठी उपायुक्त रोहिदास दोरकुळकर, उपायुक्त (समाजकल्याण) प्रणाली घोंगे, उपायुक्त (शिक्षण) अनुराधा बाबर, सहायक संचालक नगररचना अजय साबळे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. संदिप गाडेकर, शहर अभियंता जमील पटेल, सहायक आयुक्त अजीत महाडीक, अंतर्गत लेखा परिक्षक नंदकुमार चौधरी, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी १ ते ५ आणि सर्व विभागप्रमुख उपस्थीत होते अशी माहिती पालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी 'दै.ठाणे जीवनदीप'ला दिली.

# कल्याण डोंबिवली मानपासमोर ५७५ कोटीच्या कर वसुलीचे आव्हान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

**कल्याण -** कल्याण डोंबिवली पालिकेच्या २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये मालमत्ता कराचा लक्ष्यांक ७९८ कोटी आहे. मार्च ते नोव्हेंबर या कालावधीत पालिकेने २२३ कोटीची कर वसुली केली आहे. मे, ऑक्टोबरमधील लोकसभा, विधानसभा निवडणूक कामांमध्ये पालिका कर्मचारी व्यस्त राहिला. त्याचा कर वसुलीवर परिणाम झाला. त्यामुळे मालमत्ता कर वसुलीचा निर्माण झालेला ५७५ कोटीचा खड्डा भरून काढण्याचे मोठे आव्हान येत्या तीन महिन्याच्या कालावधीत कर्मचाऱ्यांसमोर आहे.

पालिकेच्या महसुलात मालमत्ता कर हा सर्वाधिक महसुली उत्पन्नाचा स्त्रोत आहे. मागील मार्च ते नोव्हेंबर कालावधीत कर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी २२३ कोटीचा मालमत्ता कर वसूल केला. यंदाचा मालमत्ता कराचा लक्ष्यांक ७९८ कोटी आहे. येत्या जानेवारी ते मार्च अखेरपर्यंत कर्मचाऱ्यांना मालमत्ता कराचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी ५७५ कोटीची कर वसुली करावी लागणार आहे.

मागील निवडणुकांमुळे निर्माण झालेला कर वसुलीचा खड्डा भरण्यासाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी कर थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करणे, त्या माध्यमातून कर वसुली करण्याचे आदेश दिले आहेत. ही मोहीम प्रभागस्तरावर साहाय्यक आयुक्त, कर कर्मचारी राबवित आहेत. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये पालिकेने मालमत्ता कराची ३१० कोटीची वसुली केली होती. अभय योजनेच्या माध्यमातून पालिका तिजोरीत १०० कोटीचा महसूल जमा झाला होता.

मागील वर्षी लवकरच अभय योजना लागू करण्यात आली होती. यंदा ही योजना १४ डिसेंबर ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या माध्यमातून पालिकेकडे मालमत्ता कर थकबाकीदारांकडून अधिकची कर वसुली झाली तर ५७५ कोटीच्या वसुलीला या योजनेतील कर वसुलीचा मोठा आधार मिळणार आहे. अंदाजपत्रकातील ७९८ कोटीचा लक्ष्यांक पूर्ण करणे प्रशासनाला शक्य होणार आहे.




# जिल्हा परिषदेचा ढिसाळ कारभार!

# जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षकांची देणी रखडली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण ।** ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभाराने सेवानिवृत्त शिक्षकांची थकीत बिलांची आर्थिक कोंडी झाली आहे. निवृत्त झालेले शहापूर तालुक्यातील असंख्य शिक्षक आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. सातव्या वेतन आयोगाचा आणि इतर फरक बिलांची रक्कम अदा न केल्याने सेवानिवृत्त शिक्षकांनी शिक्षण मंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच थकीत देयके तात्काळ देण्याची मागणी ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे केली आहे. शहापूर पंचायत समितीच्या अख्यारीत गेल्या काही वर्षात सेवानिवृत्त झालेल्या असंख्य शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाची पाचव्या हत्याची रक्कम, महागाई भत्ता फरक बिल तसेच २०२१ ते फेब्रुवारी २०२२ पर्यंतची २२ महिन्याची थकीत भत्त्यांची बिले ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण मंडळाच्या ढिसाळ कारभारामुळे अद्यापही मिळाली नाहीत. आर्थिक बिलांसाठी ठाणे जिल्हा परिषद स्तरावरून नऊ सप्टेंबर २०२४ रोजी तरतूद वितरित केली गेली होती. एकीकडे राज्यातील सर्व जिल्ह्यातील शिक्षकांना आर्थिक देयके तसेच इतर भत्ते यापूर्वीच वितरित केली असल्याची माहिती एका वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षकाने बोलताना दिली आहे. शहापूर तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना मिळणारे भत्ते तसेच सातवा वेतनाचा पाचवा हप्ता केवळ शहापूर तालुक्यातील सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना जाणीवपूर्वक दिले गेले नसल्याचा ठपका या शिक्षकांनी शिक्षण मंडळावर ठेवला आहे.

ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे याबाबत वारंवार थकीत रकमे संदर्भात निवेदन सादर करूनही याकडे कायम दुर्लक्ष केले गेल्याने सेवानिवृत्त शिक्षक शिक्षण मंडळाच्या कारभाराने मेटाकुटीला आले आहेत. सातव्या वेतन आयोगातील पाचव्या हप्त्याची थकीत रक्कम महागाई हप्त्याची देयके शहापूर पंचायत समिती शिक्षण विभागातील संबंधितांची जबाबदारी असतानाही त्यांनी याकडे कानाडोळा केला आहे. थकीत देयकांची रक्कम लटकवीत ठेवल्याने वयोवृद्ध आणि आजारी असणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षकांची यामुळे आर्थिक स्थिती खालावली गेली आहे. याबाबत सेवानिवृत्त शिक्षक ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण मंडळाच्या विरोधात लवकरच बेमुदत उपोषण करणार असल्याची माहिती यावेळी निवृत्त शिक्षकांनी दिली आहे.

# जीवनदीपच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरावर उल्लेखनीय कामगिरी



जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी ता शहापूर जि ठाणे येथील कु वैभव जाधव ( एम.एस्सी व्दितीय वर्ष ) याने ६० किलो वजनी गटात पाचवा क्रमांक तर कु. अतुल अधिकारी ( तृतीय वर्ष बॅचलर ऑफ आर्टस) याने ६५ किलो वजनी गटात शरीर सौष्ठव या स्पर्धेत मुंबई विद्यापीठ स्तरावर कांस्य पदक विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल श्री रविंद्र घोडविंदे ( अध्यक्ष, जीवनदीप शैक्षणिक संस्था) प्रा कैलास कळकटे ( प्र.प्राचार्य) प्रा सोनाली शेलार ( क्रिडा प्रशिक्षक) सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# विनोद शोधण्यासाठी 'शोधकदृष्टी' हवी

## - निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त रविकिरण पराडकर



### 'वर्दीतील विनोद आणि कविता' कार्यक्रम सार्वजनिक वाचनालय येथे संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**

दि १९ : निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त मुंबई रविकिरण पराडकर यांच्या 'वर्दीतील विनोद आणि कविता' हा कार्यक्रम सार्वजनिक वाचनालय कल्याण व क.डो.म.पा यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा.भावे व्याख्यानमाले अंतर्गत नुकताच वाचनालयाच्या सभागृहात संपन्न झाला.

त्यावेळी ते म्हणाले की विनोद हा सर्व क्षेत्रव्यापक आहे. डॉक्टर किवा पोलिस कितीही रुक्ष खाते असले तरी सगळीकडे विनोद हे घडतच असतात पण ते शोधण्यासाठी माणसाला एक 'शोधकदृष्टी' हवी. त्यांना त्यांच्या ३७ वर्षांच्या नोकरीच्या कारकिर्दीत अनेक छोटे-मोठे अनुभव आले काही चांगले काही वाईट पण त्यातूनही त्यांनी विनोद शोधून हा कार्यक्रम तयार करुन लोकांसमोर सादर करण्यास सुरुवात केली. ते शीघ्र कवी सुद्धा आहेत. एकदा त्यांचीमान अवघडली असताना सुद्धा त्याच्यावर त्यांना एक सुदंर कविता सुचली.एवढ्या सगळया धकाधकीच्या जीवनात माणूस आपला आनंद कसा घ्यायचा हेच विसरलाय तो आनंद घेण्यासाठी मनोरंजन हवे. वर्दी म्हंटली की माणसाच्या मनात एक भीती उत्पन्न होते पण वर्दीतही कसे मनोरंजन होते हे रविकिरण पराडकरांनी त्यांच्या खास शैलीत प्रेक्षकांना सांगून त्यांना हसवले. सर्व प्रेक्षक काही काळ आपले दुःख, ताण विसरून फक्त हसण्याचा आनंद लुटत होते हाच या कार्यक्रमाचा त्यांचा मूळ उद्देश आहे. याप्रसंगी प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, सरचिटणीस भिकू बारस्कर, उपाध्यक्ष आशा जोशी, चिटणीस माधव डोळे व निलीमा नरेगलकर, खजिनदार दिलीप कर्डेकर, कार्यकारिणी सदस्य अरविंद शिंपी, ग्रंथसेविका, वाचकवर्ग तसेच पु.लंचा तमाम चाहतावर्ग उपस्थित होता. वाचनालयाच्या सभागृहात हास्यकल्लोळात कार्यक्रमाचे सादरीकरण झाले.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

दि १९ : भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतिकृतीची परभणी येथे केलेली तोडफोड आणि यामध्ये शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला मृत्यू पाहता या घटनेच्या निषेधार्थ पेण तालुक्यातील आंबेडकरी समाजाकडून जाहीर निषेध करत घटनेची सखोल चौकशी होऊन आरोपींवर कडक कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन पेण तहसील दार व पेण पोलिस अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

परभणी येथे १० डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतिकृतीची एकाने केलेली तोडफोड आणि याच आंदोलनादरम्यान पोलिसांकडून अमानुषपणे झालेल्या मारहाणीत १३ डिसेंबर रोजी येथील शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडी मृत्यू झाल्याने या दोन्हीं घटनेच्या निषेधार्थ संपूर्ण राज्यभर आंबेडकरी समाज रस्तावर उतरला असूनया घटनेच्या निषेधार्थ आजपेण येथे रॅली काढून याबाबतचे निवेदन देऊन आरोपींवर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली.यावेळी माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, प्रतिभा जाधव, जनार्दन जाधव, पीआरपी जिल्हाध्यक्ष सिताराम कांबळे, बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनावणे, गंगाराम गायकवाड, संदेश गायकवाड, राजेश कांबळे, आनंद जाधव, कैलास जाधव, संदीप सुर्वे, निलेश मोरे, प्रशांत कांबळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष अशोक मोकल आदिंसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांनी नियोजन भवन, ठाणे येथे आयोजित केलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ मध्ये १४० अंबरनाथ (अ.जा.) विधानसभा मतदार संघात निवडणकीच्या काळात चांगले नियोजनबध्द काम करून निर्विघ्नपणे निवडणुका पार पाडल्याबद्दल जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांचा गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी मा.श्री अशोक शिनगारे सर जिल्हाधिकारी ठाणे, यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह स्वीकारताना मी. त्याप्रसंगी मा. श्रीम. जायभाये मॅडम अपर जिल्हाधिकारी ठाणे, मा.श्री.संदीप माने सर निवासी उजिल्हाधिकारी ठाणे, व श्रीम. वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (निवडणूक), ठाणे हे उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळा कोरावळेची केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

दि १९ : १७ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत तुळई केंद्रात जिल्हा परिषद शाळा कोरावळेच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत विविध प्रकारांमध्ये पहिले स्थान पटकावले आहे.

प्रथम क्रमांक विजेते प्रकार कबड्डी (मुले व मुली),खो,खो,(मुले व मुली), लंगडी (मुले व मुली),५०मीटर धावणे(मुली) १०० मीटर धावणे,रिले(मुले व मुली), लांब उडी (मुले व मुली)५० मीटर धावणे (मुले) या प्रकारात शाळेने दुसरे स्थान प्राप्त केले.

या उल्लेखनीय यशासाठी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच विशेषतः मुख्याध्यापक दिगंबर पोटे सहशिक्षक सीमा सोनवणे .शोभा उबाळे . अनिल भोईर कृष्णकांत मलिक ( जिल्हाध्यक्ष, शिक्षक परिषद), . प्रशांत माळी . प्रतीक्षा व.श वृषाली धुमाळ यांचे हार्दिक अभिनंदन. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश शाळेचे गौरव आहे. विद्यार्थ्यांच्या या यशावर पालक व समाजातील सर्व माध्यमांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिल्हा परिषद शाळा कोरावळे केवळ क्रीडा क्षेत्रातच नव्हे तर शैक्षणिक व सर्वांगीण विकासातही वेगाने प्रगती करत आहे.

### स्वर्गीय डॉ. सदानंद हरी पाटील यांच्या स्मरणार्थ झिडके येथे

# नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**झिडके-अंबाडी(विजय गायकवाड)**

लायन्स क्लब ऑफ जुहू प्रायोजितङ आणि वसई अंधदुःख निवारक मंडळङ डोळयांचे व जनरल धर्मादाय रुग्णालय ,वसई आयोजित'स्वर्गीय डॉ . सदानंद हरी पाटील यांच्या स्मरणार्थ मोफत नेत्रचिकित्सा व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर ( वर्ष ४४ वे ) रविवार दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी रेणुका विद्यालय, झिडके,ता.भिवंडी,जि. ठाणे येथे यशस्वीपणे संपन्न झाले सदर शिबिराला विशेष सहकार्य सहकार्य प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ,शाखा - वङ्कोश्वरी आणि समर्पण फाउंडेशन व नवजीवन हॉस्पिटल , अंबाडी नाका यांचे लाभले.

शिबिरात सर्वप्रथम स्वर्गीय डॉ. सदानंद पाटील व स्वर्गीय श्रीमान विवेकानंद म्हात्रे यांना श्रद्धांजली अर्पण केली.डॉ .सदानंद हरी पाटील यांच्या जीवनप्रवासावर व सामाजिक कार्यावर प्रकाश झोत टाकणारी एक चित्रफीत श्री. विशाल बबन लाटे यांच्या सौजन्याने उपस्थित सर्वांना दाखविण्यात आली. या शिबिरात नेत्रविकार विशेषतज्ञ डॉ. सागर व डॉ. गौरी खरोसेकर यांनी उपस्थित जवळपास २५३ नेत्ररुग्णांची मोतीबिंदू साठी तपासणी करून ऑपरेशन साठी मार्गदर्शन केले.

जवळपास ११० रुग्णांना मोतीबिंदूच्या ऑपरेशनची आवश्यकता असलेल्या रुग्णांना वसई अंधदुःख निवारक मंडळाच्या रुग्णालयात(डोळयांचे हॉस्पिटल) दाखल करून व लेन्स बसवून मोफत बिना टाक्याचे ऑपरेशन करण्यात येईल. ऑपरेशनच्या रुग्णांची झिडके ते वसई येथे नेण्यासाठी व आणण्यासाठी बसची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे .

रुग्णालयातील वास्तव्याच्या काळात चहा,नाश्ता,भोजन व औषधोपचाराची व्यवस्था मोफत करण्यात येणार आहे.या शिबिरात दृष्टीतज्ञ प्रणाली जाधव, तृप्ती म्हात्रे व ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सर्व नेत्र रुग्णांचे अत्याधुनिक कंप्युटराईझड मशीनवर चष्म्याचा नंबर तपासून चष्मा बनवण्यासाठी मार्गदर्शन केले. सदर शिबिरात समर्पण फाउंडेशन,आणि नवजीवन हॉस्पिटल , अंबाडी नाका यांच्या सौजन्याने सर्व नेत्ररुग्णांची मोफत ब्लड शुगर ( डायबिटीस ) , ब्लड प्रेशर ( बी.पी. /रक्तदाब ) व ई. सी. जी. तपासणी मोफत करून उपचार व मार्गदर्शन केले.

या शिबिरात लायन्स क्लब जुहू मुंबई चे सन्माननीय पदाधिकारी श्री. आशिष झवेरी , श्री. पियुष कार्या व श्री. शैलेश मेहता उपस्थित होते. वसई अंध दुःख निवारक मंडळ चे पदाधिकारी श्री. अरुण चव्हाण ,श्री. रविंद्र राऊत, श्री. रंगनाथ जाधव व त्यांच्या हॉस्पिटल चा पूर्ण स्टाफ उपस्थित होते.तसेच स्वर्गीय डॉ. सदानंद हरी पाटील यांचे सर्व कुटुंबीय श्रीम. संपदा पाटील, श्री. सागर पाटील, श्रीम. प्रीती पाटील, डॉ. अविनाश पाटील, श्री. नरेंद्र पाटील, श्री. मधुकर पाटील, डॉ. गौतम पाटील, डॉ. दामिनी पाटील ,डॉ. अनुजा माडकर व डॉ. छानसी पाटील यांनी सर्वांनी उपस्थित राहून अतिशय मेहनत घेऊन शिबिर यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

आर्यन्स फाउंडेशनचे कल्पेश (बाळू) जाधव व त्यांचे मित्रपरिवार आणि श्री. रोहिदास वाघे व श्री. रोहिदास पाटीलङ यांनी या शिबिराचे परिसरातील गावोगावी जाऊन प्रचार करून नेत्ररूग्णांना मार्गदर्शन करण्यासाठी व पूर्वतयारी साठी अथक परिश्रम घेतले. प्रजापिता ब्रम्हकुमारी ईशवरीय विश्वविद्यालय वङ्कोश्वरी च्या संचालिका सरिता बहेन आणि त्यांचे सहकारी अँड. संजय पाटील ,मिलिंद भोईर आणि विठ्ठल शेलार यांनी उपस्थित राहून नेत्ररूग्णांची नावनोंदणी व ईतर सेवेसाठी साठी सहकार्य केले.समर्पण फाउंडेशन,अंबाडी नाका चे डॉ. विनय पाटील, डॉ. वर्षा पाटील,श्री. सतीश पाटील, श्री. राकेश पाटील' , श्री. नरेश पाटील श्री. प्रशांत पाटील आणि नवजीवन हॉस्पिटल ,अंबाडी नाका व शिवम पॅथॉलॉजी लॅब ,अंबाडी नाका येथील पूर्ण स्टाफ यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

श्री. दिनेश दाभणेङ यांनी संपूर्ण शिबिराच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व शिबिराच्या प्रचारासाठी उत्कृष्ट सहकार्य केले. दरवर्षी हे शिबिर डिसेंबर महिन्याती याच ठिकाणी घेऊन स्वर्गीय डॉ सदानंद पाटील यांचे दृष्टीदानाचे पवित्र कार्य असेच अखंडित चालू ठेवण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी केला.

# जवाहर नवोदय विद्यालय भातसानगर येथील जागेत व्हावे



### मा. आ. पांडुरंग बरोरा यांची मागणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**वासिंद(प्रतिनिधी)**

ठाणे जिल्ह्यासाठी मंजूर झालेले जवाहर नवोदय विद्यालय हे शहापूर तालुक्यातील भातसानगर येथील जागेत व्हावे अशी मागणी माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी राज्याचे कॅबिनेट मंत्री गणेशजी नाईक यांची नागपूर येथे भेट घेऊन केली आहे.शहापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी ठाणे जिल्ह्याला जवाहर नवोदय विद्यालय असावे याकरिता सन २०१७-१८ साली विधानसभेत प्रश्न उपस्थित करून शासनाकडे मागणी केली होती. तर नवोदय स्पर्धा परीक्षेत बहुसंख्य विद्यार्थी हे शहापूर तालुक्यातील उत्तीर्ण होत असल्याने नवोदय विद्यालय हे शहापूर तालुक्यातील भातसानगर येथील जागेत असावे यासाठी अनेक पालकवर्ग व शिक्षकांची मागणी होती. त्यामुळे या अनुषंगाने केंद्र सरकारने ठाणे जिल्ह्यासाठी मंजूर केलेले जवाहर नवोदय विद्यालय हे शहापूर तालुक्यातील भातसानगर येथील जागेत व्हावे यासाठी माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी राज्याचे कॅबिनेट मंत्री गणेशजी नाईक यांची नागपूर येथे भेट घेऊन मागणी केली आहे.

# कल्याण रेल्वे स्टेशन बॉम्बने उडवून देण्याची अफवा

## मध्यवर्ती पोलीस ठाण्यात फोन करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी)**

दि १९ : मध्यरात्रीच्या सुमारास उल्हासनगरच्या मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या फोन खणखणला. समोरच्याने कल्याण पोलीस स्टेशन उडवून देणार असल्याचे सांगताच एकच धावपळ सुरू झाली. रेल्वे पोलिसांनी रेल्वे स्थानक तपासले मात्र बॉम्ब कुठे मिळून आल्यानंतर ही अफवा असल्याचे सिद्ध झाले.अखेर याप्रकरणी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रात्री सव्वा बारा वाजताच्या सुमारास मध्यवर्ती पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी गणेश सर्जेराव मोरे हे कर्तव्यावर होते. त्यावेळी पोलीस ठाण्याचा फोन खणखणला. मोरे यांनी फोन उचलल्यावर समोरच्या व्यक्तीने मी दिल्लीवरून बोलतोय, असे म्हणत एका व्यक्तीचा नंबर सांगितला. या व्यक्तीने कल्याण रेल्वे स्थानकात बॉम्ब ठेवला असल्याचे त्यांने सांगितले.तसेच कल्याण रेल्वे स्टेशन बॉम्बने उडवून देणार असल्याचेही सांगितले. त्यानंतर तात्काळ मध्यवर्ती पोलिसांनी ही माहिती ठाणे कंट्रोल रूम आणि कल्याण रेल्वे पोलिसांना दिली.

कल्याण रेल्वे पोलिसांनी तात्काळ बॉम्ब शोध पथक आणि डॉग स्क्वाडच्या माध्यमातून पूर्ण रेल्वे स्थानक पिंजून काढले.

तब्बल तीन ते चार तास झालेल्या सर्च ऑपरेशन नंतर बॉम्बची अफवा असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर तात्काळ मध्यवर्ती पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे यांनी वरिष्ठांच्या मान्यतेने बॉम्बच्या अफवेचा फोन करणाऱ्या अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

दि १९ : राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

योजनेचा उदेश-राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशिलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे,

**पात्रता व अटी** :- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ से ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इचिछणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती,जमाती,महिला, अपंग,माजी सैनिक,इ.मा.व.,वि.जा.,अ.ज.,अल्पसंख्याक) ५ वर्षांची अट शिथिल, रु. १० लाखावरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रू. २५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास, अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

प्रकल्प मर्यादा किंमत- प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा,कृषी पूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. २० लाख. योजना अंमल बजावणी यंत्रणा - शहरी भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र, ग्रामीण भागांसाठी जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.आर्थिक अनुदान -प्रवर्ग व स्थाननिहाय १५ टक्के ते ३५ टक्के पर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे आणि स्वगुंतवणूक ५ टक्के ते १० टक्के राहील. वित्तीय संस्था/ बँक -सर्व राष्ट्रीय बँका, खाजगी बँका तसेच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत प्रकरण करता येईल.

योजनेअंतर्गत पात्र घटक- सेवा उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारीत उद्योग, ई. वाहतूक व्यवसाय,फिरते विक्री केंद्र इ., अर्जाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी https://maha-cmegp.gov.in, ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. उत्पादन प्रवर्गातील उद्योगांसाठी २ आठवडे व सेवा, कृषीपुरक उद्योग व्यवसायासाठी १ आठवडा मुदतीचे प्रशिक्षण असेल.

या योजनकरिता सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे : जन्मदाखला /शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/ वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रते संबंधिचे कागदपत्रे प्रमाणपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड, नियोजित उद्योग, व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (सध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल, जातीचे प्रमाणपत्र (एस.सी.एस.टी. प्रवर्गासाठी), विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक),वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking). अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड बाजार समोर, रायगड-अलिबाग येथे संपर्क साधावा.



आज मोठागाव ते दुर्गाडी रिंग रोड टप्पा क्र ३ व मोठागाव ते कोपर रिंग रोड टप्पा क्र २ च्या जागेची पाहणी केली, सदर रस्त्याच्या जागेचे शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देऊन भूसंपादन करून रिंग रोड चे काम लवकरच सुरू करावे जेणेकरून नागरिकांना वाहतूक कोंडी पासून मुक्तता मिळेल . त्याचबरोबर डोंबिवलीत होणाऱ्या नेचर पार्कच्या कामाची पाहणी केली .

यावेळी क.डो.म.पा च्या शहर अभियंता सौ अनिता परदेशी मॅडम, कार्यकारी अभियंता श्री घनश्याम नवांगुळ साहेब उप अभियंता श्री अजय महाजन साहेब उपस्थित होते .




१९ डिसेंबर २०२४
गुरुवार

**मेष**
कोणतेही काम करताना मन शांत ठेवावे. यामुळे तुमचे काम सहज पूर्ण होईल. पैशाशी संबंधित मोठे निर्णय काळजीपूर्वक विचार करूनच घ्यावेत.

**वृषभ**
या राशीच्या प्रेमी युगुलांसाठी आजचा दिवस चांगला आहे. महिलांना गृहउद्योग सुरू करायचा असेल तर आजचा दिवस चांगला जाईल.

**मिथुन**
आरोग्याच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. दिवसाचा अधिक वेळ प्रवासात घालवू शकता. कुटुंबियांसोबत वेळ घालवाल. व्यापारी वर्गाला आर्थिक लाभ होईल.

**कर्क**
आज कुटुंबासोबत कुठेतरी बाहेर जाणे तुमच्यासाठी चांगले राहील.विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला राहील.विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**सिंह**
तुमची वागणूक सुधारण्याचा प्रयत्न कराल. तुमच्या काही कामांमध्ये जास्त वेळ लागेल, तुम्हाला सर्वांचे पूर्ण सहकार्य मिळेल.

**कन्या**
तुमची आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.कामाच्या ठिकाणी चांगले काम करण्याचा प्रयत्न कराल. मेहनतीने केलेल्या कामात यश मिळेल.

**तूळ**
तुम्हाला कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेशी संबंधित चांगली बातमी मिळेल. आर्थिक क्षेत्रात स्थिरता राहील. मित्रांसोबत काही आनंदाचे क्षण घालवाल.

**वृश्चिक**
ऑफिसमधील वरिष्ठ तुमचे काम पाहून आनंदित होतील. तुमच्या प्रियकरासाठी आजचा दिवस अनुकूल असेल.ज्यामुळे तुमचा गोंधळ उडेल.

**धनु**
या राशीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नवीन प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळेल. जीवनात सुख मिळेल.प्रलंबित असलेली सरकारी कामे पूर्ण होतील.

**मकर**
एखाद्या व्यक्तीकडून तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होईल. घरातील कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी वडीलधाऱ्यांचे मत तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.

**कुंभ**
ऑफिसमध्ये काही लोकांची मदत मिळेल. विद्यार्थ्यांनी आज अभ्यासात अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल.

**मीन**
आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल.मेहनतीचे फळ तुम्हाला नक्कीच मिळेल.आर्थिक लाभ होईल. भविष्य सुधारण्यासाठी पावले उचलाल.

दैनिक जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

- E Mail -

jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# 'आपले सरकार पोर्टल'वरील २ हजार ३०१ तक्रारी निकाली

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी)**

दि १९ : राज्य सरकारने सुरु केलेल्या आपले सरकार २.० वरील तक्रारी निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे सामान्य प्रशासन विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात आले आहे. जिल्हा परिषदेस दि. १९ सप्टेंबर, २०२३ रोजी पासून आपले सरकार पोर्टलवर २ हजार ३२६ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ हजार ३०१ तक्रारी निकाली काढल्या आहे तर फक्त २५ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय स्तरावर विस्तृत अहवाल मागणीसाठी प्रलंबित आहेत. या पोर्टलद्वारे ग्रामस्थांना आपल्या तक्रारी ऑनलाइन दाखल करणे तसेच त्याची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध असून ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात यश मिळवले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेकडे येणाऱ्या तक्रारी २१ दिवसांच्या आत निकाली काढण्यासाठी सर्व विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक सोमवारी साप्ताहिक सखोल आढावा घेण्यात येतो. तक्रारदाराची तक्रार मांडणी व्यवस्थित न झाल्यास किंवा म्हणणे न समजल्यास तक्रारदारास दूरध्वनीवर तात्काळ संपर्क केला जातो. तक्रारींचे निवारण ठाणे जिल्हा परिषदेकडून उत्तमप्रकारे होत असल्याबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अविनाश फडतरे यांनी दिली.

केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधार विभागामार्फत सुशासन सप्ताह अंतर्गत 'प्रशासन गाव की ओर' हे अभियान जिल्ह्यात दि.१९ ते २४ डिसेंबर, २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी निकाली काढण्यासाठी देखील यशस्वीरित्या प्रयत्न करण्यात येणार आहे.

## राज्यपाल कार्यालयाने चौकशीचे निर्देश देऊनही
# सार्वजनिक बांधकाम विभागातील घोटाळ्याची चौकशी संथगतीने

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

दि १९ : राज्यपाल कार्यालयाने चौकशीचे निर्देश देऊन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागातील घोटाळयाप्रकरणी चौकशी संथगतीने सुरू असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी केला आहे.

ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत कोरोना काळात सर्व राज्य ठप्प झालेला असताना काम केल्याचे भासवून खोटे बील काढण्यात आल्याचे साळवे यांच्या निदर्शनास आले होते. तसेच झालेल्या संभाव्य २०० कोटी रुपयांचा घोटाळा हा एका प्रकारे सरकार व जनतेचे फसवणूक आहे. या बद्दलचा संशय असल्याकारणाने महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी दिनांक २९/५/२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्या अंतर्गत अधिक्षक अभियंता ठाणे यांना माहिती मागीतली होती परंतु त्यांनी माहिती अधिकार अर्जाचे उत्तर दिला नाही.

त्यावरून नोवेल साळवे यांच्या संशयाला पुष्टी मिळाली आणि या संभाव्य २०० कोटी रुपयांचा घोटाळयाप्रकरणी दिनांक १६/७/२०२४ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालांना तक्रार निवेदन देऊन सीबीआय चौकशी करण्याची विनंती नोवेल साळवे केली होती. त्यावर राज्यपाल कार्यालयाकडुन संबंधित विभागाला चौकशीचे निर्देश देण्यात आले होते. परंतु राज्यपाल कार्यालय कडून चौकशीचे निर्देश देऊन सुद्धा ४ महीने उलटले तरीही आजपर्यंत चौकशीचा कुठलाच थांगपत्ता लागला नाही.

एकंदरीत सार्वजनिक बांधकाम विभागातील भ्रष्टाचाराचे पाळेमुळे खूप खोल वर असावेत म्हणूनच चौकशी पूर्ण होत नाही असा आरोप नोवेल साळवे यांनी केला आहे. साळवे यांनी सांगितले की जर या झालेल्या संभाव्य भ्रष्टाचाराची चौकशी लवकरात लवकर झाली नाही आणि दोषी असलेल्या सर्व अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्यात आली नाही तर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा साळवे यांनी दिला आहे.

## तेथे कर माझे जुळती



# अशफाक उल्लाह खान
**(२२ ऑक्टोबर १९००– १९ डिसेंबर १९२७)**

कांतिकारक अशफाक उल्लाह खान यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९०० रोजी उत्तर प्रदेशातील शहाजहानपूर येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव शफीक उत्ताह खान आणि आई चे नाव मजरु श्रीसा असे होते. ते लहानपणापासून नियमित पणे व्यायाम करीत असत, त्यामुळे त्यांचे शारीर पिळदार होते. रामप्रसाद बिस्मिल यांच्या संपर्कात ते आले म्हणून क्रांतीकार्यांकडे ओढले गेले. त्यानंतर असहकार आंदोलनात ते सहभागी झाले. क्रांती घडवून आणण्यासाठी निधी जमविणे आवश्यक असल्याने ते काकोरी कटात सहभागी झाले. त्यांच्यासोबत इतर क्रांतिकारकही होते. या दरोड्यामध्ये ४६०१ रुपये लुटले गेले. या पैशांचा विनियोग देशकार्यासाठी करण्यात येणार होता. ठरल्याप्रमाणे काकोरी रेल्वे खजिना तुटला गेला.

तेव्हा तात्काळ अशफाक ने त्याच्या मजबूत अशा हातांनी खजिन्याची पेटी फोडली. सदर पेटीत ६००० चांदीचे रुपये होते. त्यांचे वजन तीन मण इतके होते. ती सर्व रक्कम लखनऊ येथे पोहोचवण्याचे काम चंद्रशेखर आझाद यांनी केले. त्यासाठी त्यांनी २४ मैलाचा वळसा घालून सायकलीने प्रवास केला. अशाप्रकारे ऑगस्ट महिन्यात खजिना लुटला गेला होता. नंतर २६ सप्टेंबर १९२५ ला सगळीकडे झडत्या घेतल्या गेल्या. संशयितांना ताब्यात घेतले. अटकसत्र सुरू झाले. पण चंद्रशेखर आझाद त्यातून सहि सलामत सुटले, चाणाक्षपणाने निसटले. ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी रेलगाडीत खजिना लुटला गेला होता. त्याबाबत २४ हून अधिक संशयितांना पकडण्यात आले होते. अशा वेळी अज्ञात ठिकाणी राहणे अशफाक यांनी पसंत केले. वेषांतर करून रशिया जाण्याचा बेत आखला होता. पण पठाण नावाच्या मित्राने धोका दिला. त्याने अशफाक यांचा पत्ता पोलिसांना दिला.

पुढे १७ जुलै १९२६ ला पोलिसांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांना कैद केले. शेवटी १९ डिसेंबर १९२७ रोजी स्वतंत्रता सेनानी राम प्रसाद बिस्मिल, अशफाक उल्लाह खान व ठाकूर रोशन सिंह यांना काकोरी रेल्वे खजिन्याची लूट केल्याबद्दल फाशीची शिक्षा दिली. फैजाबाद जेल मध्ये अशफाक उल्लाह खान यांची जीवन यात्रा संपली. त्याच्या बलिदाना बरोबर इतिहासात त्यांची शायरीही अजरामर झाली आहे, ती पुढीलप्रमाणे आजाद ही हो लेंगे, या सर ही कटा देंगे। तुम हाथ उठा ओगे, हम पैर बढ़ा देगे। दिलवाओ हमे फांसी, ए लानसे कहते है।खून सेही हम शहीदोंके, फौज बना देंगे। मुसाफरि जो अंदमान के, तूने बनाए जालीम। आजाद ही होनेपर, हम उनको बुला लेंगे ।



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते
# गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी)**

दि १९ : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. www.home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच अन्य विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.



हे नवीन संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर विविध जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क (ऑनलाईन सेवा), आपले सरकार, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई पोलीस,महाराष्ट्र सागरी मंडळ, महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमी, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, पोलीस संशोधन केंद्र, (सीपीआर) पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, महाराष्ट्र सुरक्षा दल, मुंबई वाहतूक पोलीस, एनजेडीजी । राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड, देशाच्या सेवेत भारतीय पोलीस, राष्ट्रीय तुरुंग माहिती पोर्टल, ई-प्रोसिक्युशन आदी विभागांचे जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# बालक मंदिर शाळेच्या रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

दि १९ : शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात कलेचे अनन्यसाधारण महत्व आहे. कलेमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक बौद्धिक विकासात वाढ होते. त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळून सृजनशीलता वाढीस लागते. विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने कल्याण मधील बालक मंदिर संस्थेच्या प्राथमिक शाळेने गेली आठ वर्षे या जिल्हास्तरीय आंतरशालेय रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन केले आहे. यंदाचे हे स्पर्धेचे नववे वर्ष आहे. नेहमीप्रमाणे इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तारीय आंतर शालेय रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील बहुसंख्य शाळांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने भाग घेतला. यावर्षी मात्र स्पर्धेला सर्व शाळांतील विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. सर्व शाळांतील जवळपास ९००० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला.



शाळेतील सर्वच शिक्षकांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी खूप मेहनत घेतली.या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कल्याण येथील बालक मंदिर संस्थेच्या सभागृहात नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, सुबोध गोठोस्कर, तृप्ती माळीचकर, राजेंद्र फडके निमंत्रित सदस्यं शालेय समिती बालक मदिर संस्था प्राथमिक शाळा उपस्थित होते. याप्रसंगी बालक मंदिर संस्थेचे सर्व पदाधिकारी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना आकर्षक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शाळांतील कला शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला बालक मंदिर संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच प्रदीप जोशी, अमोल धर्माधिकारी यांनी उत्तम परीक्षण करून स्पर्धा यशस्वी होण्यास सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कामिनी पाटील व आभार प्रदर्शन प्रकाश पानसरे यांनी केले. कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे, वक्ते व परीक्षकांची ओळख सुबोध कुलकर्णी, भालचंद्र घाटे यांनी केली. ईशस्तवन व स्वागत गीत कामिनी पाटील यांनी बसवले.

स्पर्धा प्रमुख म्हणून विलास लिखार व प्रकाश पानसरे यांनी काम पाहिले.कार्यक्रमाची सांगता रेखा महिंद्रकर यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली.

# मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर आ. निरंजन डावखरे यांची नियुक्ती

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी)**



दि १९ : मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) भाजपाचे आमदार निरंजन वसंत डावखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे प्रतिनिधी म्हणून आमदार डावखरे यांना नामनिर्देशित करण्यात आले आहे.

विधीमंडळातील तरुण चेहरा म्हणून आमदार निरंजन डावखरे यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातून त्यांची २०१२ मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी विधान परिषद निवडणुकीत हॅट्रिक नोंदविली.

गेल्या १२ वर्षांच्या काळात त्यांनी विधान परिषदेत शैक्षणिक, सामाजिक आणि नागरी समस्यांकडे सातत्याने लक्ष वेधले. तसेच ते सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. राज्यातील शिक्षकांचे प्रश्नही त्यांनी हिरीरीने मांडले. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या मांडल्या असून, 'एमपीएससी'साठी बेलापूर येथे स्वतंत्र मुख्यालय मंजूर करुन घेतले. कोकणातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी सर्व शाळा डिजिटल करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यानुसार आतापर्यंत कोकणातील शेकडो शाळांना संगणकासह विविध साहित्यपुरवठा करण्यात आला.मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत कोकणातील पाच जिल्ह्यातील महाविद्यालये आहेत. त्याचबरोबर काही शहरात विद्यापीठाची उपकेंद्रे आहेत. मुंबई विद्यापीठ प्रशासन आणि महाविद्यालयातील समन्वय, तसेच उपकेंद्रात नवे अभ्यासक्रम आणि प्रशासकीय सुधारणा आदी करण्यामध्ये आमदार निरंजन डावखरे यांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.

# सुमंगल बौद्धिक अक्षम शाळेतील विद्यार्थ्यांचे क्रिडा स्पर्धेत यश






**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

दि १९ : मंगळवार १७ डिसेंबर रोजी सुहित जीवन ट्रस्ट संचालित सुमंगल बौद्धिक अक्षम मुलांची शाळा आणि एकलव्य व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, पेण - रायगड येथील विद्यार्थ्यांनी जमनाबाई नरसी स्कूल (विलेपार्ले, मुंबई) येथे झालेल्या क्रिडा स्पर्धांमध्ये अपूर्व कामगिरी केली. या स्पर्धेमध्ये रायगड आणि मुंबईच्या ४१ शाळांचा सहभाग होता. स्पर्धेत घेतलेल्या विविध क्रीडा प्रकारांमध्ये १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, जागेवर उडी, गोळाफेक, लांब उडी आणि चमचा लिंबू अशा स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धेत सुमंगल शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कार्य केले. यामध्ये सिद्धिका पाटील हिने ५० मी. धावणे व वैष्णवी शेवाळे हिने १०० मी. धावणे या स्पर्धेत सुवर्णपदक व प्रमाणपत्र मिळवले. आर्या पाटील हिने १०० मीटर धावणे या स्पर्धेत रौप्यपदक व प्रमाणपत्र मिळवले तसेच मनीष म्हात्रे व तन्मय लांगी यांनी १०० मीटर धावणे या स्पर्धेत कांस्यपदक व प्रमाणपत्र मिळवले.

या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये त्यांचे पालक, संस्था, आणि विशेषतः क्रिडा प्रशिक्षक अमोल काईनकर व सौ. प्रिती म्हात्रे यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे सर्व स्तरांमधून त्यांचे कौतुक केले जात आहे. त्यांच्या यशामुळे त्यांना इतरांपेक्षा एक वेगळी ओळख मिळालेली आहे. या विशेष विद्यार्थ्यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून ते संपूर्ण समाजाला देखील प्रेरणादायी आहे.

सर्व विद्यार्थ्यांचे आणि प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन

# कोकण कट्टाचा 'कोकण सन्मान' सोहळा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

दि १९ : समाज कार्यात अग्रेसर असणाऱ्या आणि प्रामुख्याने कोकणातील तरुणांनी मुंबई येथे स्थाईक होऊन मागील २५ वर्षांपूर्वी 'कोकण कट्टा' या सेवाभावी संस्थेचे बिज रोवले होते. आज २५ वर्षात या रोपाच रूपांतर वटवृक्षात झाले आहे. ही संस्था गेली २५ वर्षे मुंबई, नवी मुंबई, रायगड आणि कोकण या भागात विविध प्रकारे समाजिक चळवळ राबवून गरीब, दुर्बल आणि अनाथ घटकांना मदतीचा हात देत असते.

'कोकण कट्टाच्या' रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्त साधत 'कोकण सन्मान' सोहळयाचे आयोजन आज १९ डिसेंबर रोजी मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले येथे रात्री ८ वाजल्यापासून करण्यात आले आहे. या वेळी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या आणि कोकण कट्टाला वेळोवेळी सहकार्य करणाऱ्या नामवंतांचा सन्मान सोहळा या वेळी होणार आहे. तसेच अनिल देसाई यांच्या वतीने प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि श्रीकांत नारायण यांच्यासह २० नामवंत गायकांच्या सुरेल आवाजातील हिंदी, मराठी गीतांचा 'सुरश्री' सोहळाही रंगणार आहे, अशी माहिती कोकण कट्टाचे संस्थापक अध्यक्ष अजित पितळे यांनी दिली. 'दैनिक नवशक्ति' वृत्तसमूह 'कोकण सन्मान' सोहळयाचे माध्यम प्रायोजक आहे. कोकण सन्मान सोहळयात शैक्षणिक क्षेत्रात मास्टर्स क्लासेसचे गौरव सावे, उद्योजक अथर्व ग्रुपचे सचिन गुंजाळ, आरोग्यसाठी दंतचिकित्सक डॉ. रोहित कर्णिक. कलाकार प्रसिद्ध अभिनेते दिगंबर नाईक, दै. नवशक्ति पत्रकार अरविंद गुरव, सामाजिक क्षेत्रासाठी करुणेश्वर वृद्धाश्रमाचे इश्वर ढोरे, सेवाभावी देवदूत कल्पेश ठाकूर, पेण यांचा गौरव होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कुपर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर मेढेकर उपस्थित राहणार आहेत.




**आज रंगणार ('सुरश्री या कार्यक्रमा मधून होणार सुरांची उधळण)**

# जिल्हा परिषद पिसवली शाळेचे घवघवीत यश



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

दि १९ : कल्याण तालुका शिक्षण विभाग अंतर्गत सोनार पाडा केंद्राच्या क्रीडा स्पर्धा नुकताच सपन्न झाल्या या स्पर्धेत पिसवली जिल्हा परिषद शाळेने घावघवीत यश मिळविले शिवाई बालक मंदिर डोंबिवली येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेत . जिल्हा परिषद शाळा पिसवली ने भरघोस यश संपादन केले. लेझीम प्रथम,कबड्डी मुले प्रथम, खोखो मुले प्रथम,खो खो मुली द्वितीय,लंगडी मुले द्वितीय,लंगडी मुली द्वितीय,मोठा गट धावणे मुली द्वितीय मोठा गट धावणे मुले द्वितीय यशस्वी स्पर्धक व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन ग्रामस्थांनी केले. शिक्षिका वर्षा कदम व त्यांच्या सहकार्यनी स्पर्धा पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# मुरबाड नगरपंचायत, मुरबाड

ता.मुरबाड,जिल्हा.ठाणे-४२१४०१ Email id: mnpmurbad@gmail.com Ph.No.02524-225905

## दरपत्रक सूचना

मुरबाड नगरपंचायत करीता नगरपंचायत मालकीच्या टाटा-४०७ वाहनावर हायड्रोलिक शिडी बसविणे (Working Height 9m with stabilizer, hydraulic cylinder and hydraulic tank 2 nos each, Basket 1.1 X 0.7 X 1.1m, Slewing 360 degree, Working load capacity 200kg) कामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी याकामी लागू होणारे सर्व कर, वाहतूक खर्च व कायदेशीर बाबी उदा. RTO पासिंग, इ.ची पूर्तता करणेकामी येणारे खर्च अंतर्भूत असलेली सीलबंद दरपत्रके दि.२८/१२/२०२४ पर्यंत मुरबाड नगरपंचायत कार्यालयात सादर करावी.

शिक्का

जा.क्र.मु.न.प./२३३२/२०२४-२५
दि.१७/१२/२०२४

सही /-
मुख्याधिकारी
मुरबाड नगरपंचायत, मुरबाड


# ‘सकारात्मक विचारधारा ठेवा यश नक्की मिळेल’

## – वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**टिटवाळा(प्रतिनिधी)**

दि १९ : यशाला शॉटकट नसतो, प्रामाणिक प्रयत्न, आणि सुयोग्य वर्तन हे वेक्तिमत्वाच्या विकासाचे कंगोरे आहेत. सकारात्मक विचारधारा ठेवा यश नक्की मिळेल असे आवाहन टिटवाळा पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी गोवेली येथील जीवनदीप महाविद्यालया तील विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालयात त्यांचे विध्यार्थ्याशी संवाद साधण्यासाठी व्याख्यान आयोजित केले होते.

यावेळी त्यांनी विध्यार्थी - विध्यार्थिनींनी प्रथम २५८ अभ्यासाला प्राधान्य देत आपल्या आई वडिलांचे नाव लौकिक कसे होईल यासाठी प्रामाणिक पणे परिश्रम करणे गरजेचे आहे. याबाबत स्वतःचे उदाहरण देत पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी शिक्षण वेक्तिमत्व बदल घडवून आणण्याचे मुख्य साधन आहे. असे सांगत विध्यार्थ्यांना मोबाईल वापरा बाबत सूचना करत, पोलीस केस झाली तर आपले जीवन कसे बर्बाद होते या बाबत उदाहरणे देत काही प्रसंग स्पष्ट केले. मानवी जीवन मूल्यवान आहे. भावने पेक्षा कर्तव्य जोपासा असा सल्ला देत. प्रेम हे जगण्याचे साधन नव्हे, दिसतं तसे नसते, आभासी प्रेम जीवन उध्वस्त करते असे सांगत , वाहतूकीच्या नियमा संबधी त्यांनी विध्यार्थ्यांना माहिती दिली. अभ्यास करा स्वतःला घडवा असा मोलाचा संदेश त्यांनी विध्यार्थ्यांना यावेळी दिला. याप्रसंगी रवींद्र घोडविंदे, स्मिता घोडविंदे, प्राचार्य प्रकाश रोहने, शिक्षक वृंद उपस्थित होते, विध्यार्थ्याची उपस्थिती मोठया संख्येत होती.सूत्रसंचालन प्रा नरेश टेबे यांनी केले.

# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक

## – प्रधान सचिव ब्रिजेश सिंह




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी)**

दि १९ : माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला अधिक माहितीसक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच ‘एआय’ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणाऱ्या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता ‘एआय’च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने ‘आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम’(कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोकऱ्या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोकऱ्या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरताना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वतःला सिद्ध करावे लागेल. ‘एआय’च्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रुटी दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलताना दिला.

आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजूला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत ‘एआय’ ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पूर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून ‘एआय’मार्फत मिळणाऱ्या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले,

आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारतविरोधी कृत्य करण्यासाठी ‘एआय’चा वापर होणार नाही, यासाठी ‘एआय’ची माहिती भारतीय पद्धतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुद्धा ‘एआय’शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचो संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धर्मेंद्र जोरे, भूपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचो अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पद्धतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

# नवीन स्मशानभूमींसाठी पनवेल महापालिकेचा १० कोटींचा निधी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**पनवेल(प्रतिनिधी)**

दि १९ : पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये तळोजा वसाहतीमध्ये दोन ठिकाणी, कोयनावेळे आणि घोट या चार ठिकाणी नवीन स्मशानभूमीचे बांधकाम पालिका प्रशासन करणार आहे. यासाठी पालिका १०.६८ लाख रुपये खर्च करणार आहे. नुकतीच याबाबतची निविदा जाहीर करण्यात आली.तळोजा वसाहतीमध्ये हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मातील नागरिकांसाठी स्मशानभूमीसाठी विविध राजकीय पक्षांना जनआंदोलने उभारावी लागली. पालिका प्रशासनाने सिडको मंडळाकडून संबंधित भूखंडाचे हस्तांतरण झाल्यानंतर हे भूखंड ताब्यात घेऊन त्यावर विकासकामांची सुरुवात केली आहे.


# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

## PUBLIC WORKS DEPARTMENT
## TENDER NOTICE

Sealed Tender for the following works are invited by the Ulhasnagar Municipal Corporation from Contractors who are registered with Maharashtra state PWD, CPWD, MJP, BMC, etc in appropriate class. The bank tender forms can be had from the office of the city Engineer, Ulhasnagar Municipal Corporation PWD section from 19/12/2024 to 26/12/2024 on all working days from 11.00 hours to 15.00 hours on payment of Rs.590/- (Non Refundable) against each work in the form of DD/Cash. The tender will be received in the office of Executive Engineer, Ulhasnagar Municipal Corporation till 27/12/2024 up to 15.00 hours and will be opened on same day if possible.

| Sr. No. | Tender Notice No. | Name of Work | Amt Put to Tender | EMD | Time Limit | Class of Registration |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | UMC/PWD/ Notice/2024-25/5/1 | Const. of CC. Pavement & Drain in Akash Chawl No. 7 near lambte house, Ulhasnagar - 5 | 6,00,000/- | 1% | 3 Months | VI th |
| 2 | UMC/PWD/ Notice/2024-25/5/2 | Repair of Latrine at Rambai Ambedkar Nagar unr-1 | 5,50,000/- | 1% | 3 Months | VI th |
| 3 | UMC/PWD/ Notice/2024-25/5/3 | Const. of CC Pavement & Drain from Guru Kharik to Rajesh Patil house in Durga Devi Pada Ulhasnagar - 5 | 7,00,000/- | 1% | 3 Months | VI th |
| 4 | UMC/PWD/ Notice/2024-25/5/4 | Const. of CC Pavement & Ddrain in Siddhi Vinayak Chawl, Gaikwad Pada, Ulhasnagar - 5 | 7,00,000/- | 1% | 3 Months | VI th |
| 5 | UMC/PWD/ Notice/2024-25/5/5 | Const. of CC Pavement & Drain Back side of Mauli Garage Gaikwad Pada Ulhasnagar - 5 | 6,00,000/- | 1% | 3 Months | VI th |

1) Tender Documents shall neither be sent or received by post.
2) Right to reject any or all tenders without assigning any reasons what so ever is reserved with City Engineer.
3) Affidavit of Rs.100/- Stamp Paper in Prescribed form given in Annexure 1 Sworn before Executive Magistrate / Notary shall be uploaded offline (As per शासन निर्णय क्र. सीएटी/२०२२ प्र.क्र./ ५० / इमा -२, दिनांक - ११ मे, २०२२) Tender will be liable for action under Indian penal code for submission of any false / fraudulent paper / information submitted in envelope.
4) Conditional tenders will be Summarily rejected.

Date :
Place : Ulhasnagar

जावक क्रमांक : उमपा/पीआरओ/४६८/२०२४
दिनांक : १८ डिसेंबर २०२४

Sign/-
Executive Engineer
Ulhasnagar Municipal Corporation


## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात

# ‘अल्पसंख्याक हक्क दिवस’ उत्साहात साजरा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी)**

दि १९ : संयुक्त राष्ट्राने दि.१८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तुत केला आहे. त्यानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे तसेच या बाबतच्या वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी, यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या सूचनेनूसार या दिवसाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी श्री.वैभव कुलकर्णी यांनी अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्व समजावून सांगितले.

या कार्यक्रमास सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्री.भरत साळुंखे, मानव विकास विभागाचे अधिकारी श्रीमती दिपाली भोये, लेखा अधिकारी श्रीमती स्मिता नि. पट्टेकर, अल्पसंख्याक कक्षातील सांख्यिकी सहायक श्री. सुनिल नाडेकर, महसूल सहायक श्रीमती शितल जाधव व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# उल्हासनगरमध्ये पर्यावरण जनजागृती उपक्रम



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी) :**

दि १९ : महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी निर्देश दिल्यानुसार महानगर पालिका आयुक्त विकास ढाकणे आणि अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाने उल्हासनगर महानगरपालिका पर्यावरण विभागामार्फत पर्यावरणाचे संवर्धन करणे व प्रदूषण नियंत्रण करणेविषयक जनजागृती उपक्रमांतर्गत सेंच्युरी रेयॉन हायस्कुलमध्ये निबंध स्पर्धा व पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली होती.

१७ डिसेंबर रोजी सेंच्युरी रेयॉन हायस्कुलमध्ये सदरील स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांसाठी बक्षिस व प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी पर्यावरणाचे संवर्धन करणे व प्रदुषण नियंत्रण करणेविषयक जनजागृतीचा भाग म्हणुन पथनाट्य, गायन व संभाषण असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास विशाल कदम, सहाय्यक आयुक्त (पर्यावरण) उल्हासनगर महानगरपालिका, कंसल्टन गीतांजली कौशिक, सेंच्युरी रेयॉन हायस्कुलचे मुख्याध्यापिका विद्याराणी गायकवाड व बबीता सिंग का (माध्यमिक/प्राथमिक) महापालिकेतील पर्यावरण विभागाचे वरिष्ठ लिपीक, लक्ष्मण कामडी, सयाजी घाटविसावे, लिपीक सेंच्युरी शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

विशाल कदम, कंसल्टन गीतांजली कौशिक यांनी पर्यावरण संवर्धन आणि प्रदुषण नियंत्रणाचे महत्व याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले अशी माहिती मनपाच्या जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे यांनी दिली.

# जिल्हा परिषद शाळेच्या गरीब विद्यार्थ्यांना मायेची ऊब

## शिवा पारोचे यांच्याकडुन ब्लँकेट भेट

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**

दि १९ : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र ३ पारोळा येथे मुख्याध्यापक मनवंतराव साळुंखे यांच्या प्रयत्नातुन शहराचे उदयोजक शिवा पारोचे यांच्या दातृत्वातुन शाळेच्या ३८ विदयार्थ्यांना उच्च प्रतीचे आर्मी कमांडर ब्लॅन्केट भेट देण्यात आले.



या उपक्रमाच्या अध्यक्षपदी निवृत्त मुख्याध्यापक गुणवंतराव पाटील हे तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी उप नगराध्यक्ष दिपक अनुष्ठाण, वैदयकिय अधिकारी बहादरपूर डॉ सुनिल पारोचे, गायत्री परिवार संचालक माधवराव शिंपी, किशोर सोनवणे, दिलिप कोळपकर हे उपस्थित होते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.या प्रसंगी दिपक अनुष्ठाण व डॉ सुनिल पारोचे यांचा सततच्या सामाजिक कार्याबद्दल व शाळेला मदत केल्याबद्दल मान्यवरांनी सत्कार केला. यावेळी दिपक अनुष्ठाण यांनी शिवा पारोचे यांचे आभार मानुन ते समाजात करीत असलेल्या सामाजिक कार्याचा गौरव केला. गायत्री परिवाराचे संचालक माधवराव शिंपी यांनी पारोचे बंधुंच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून युवा उदयोजक बरोबर ते समाज सेवेच्या कार्यातही मनापासुन योगदान देत आहेत याबाबत अभिनंदन केले. अध्यक्ष गुणवंतराव पाटील यांनी शिवा पारोचे यांनी बालाजी मंदिर अन्नदानास केलेली मदत व त्यांच्या कार्याचे अनुभव सांगुन समाजातील अशाच दात्यांनी सहकार्य जिल्हा परिषद शाळांना देण्याचे आवाहन केले. जिल्हा परिषद शाळा दिवसागणिक सक्षम होत आहेत व समाजाचाही या शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारत्मक होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे असे प्रतिपादन केले .

डॉ सुनिल पारोचे यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे आरोग्य, स्वच्छता, आहार व हिवाळयात घेण्याची काळजी बाबत मार्गदर्शन करून सर्व विदयार्थ्यांची आरोग्य तपासणी करून ८ विदयार्थ्यांना मोफत औषधी उपलब्ध करून दिली. तसेच या बालकांसाठी लवकरच मोठया प्रमाणात आरोग्य शिबिर घेवुन गरजवंत विद्यार्थ्यांना पुढील उपचार व मोफत औषधी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला.

‘सुकून भरी सर्दी : सर्दी में सेवा की गरमाहट’ या शाळेच्या उपक्रमात हिवाळयाच्या अगोदर सर्व विदयार्थ्यांना कानटोपी युक्त उलन स्वेटर व बूट आणि पायमोजे दोन जोडी वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमाचे सुत्र संचलन मुख्याध्यापक मनवंतराव साळुंखे यांनी केले. दिपाली पाटील व तरन्नुम सैय्यद यांचे सहकार्य लाभले. अर्चना सेवलीकर यांनी आभार प्रदर्शन केले .

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी